**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय नरसिंग माळगे
घर क्र.११८, कोंढवा खुर्द,
परदेशी स्वीटच्यामागे, पुणे-४८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
रास्ता पेठ, पुणे-४११ ०११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
रास्ता पेठ, पुणे-४११ ०११

| अ.क्र | अपील क्रमांक | ७३० / पुणे |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३०.१०.२००६ |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | ४.१.२००७ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

## मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, रास्ता पेठ, पुणे-११ येथील कार्यालयात दि. २७.९.२००६ रोजी झालेल्या बैठकीच्या वेळेस सादर केलेल्या अर्जांच्या संबंधित उत्तराच्या अनुषंगाने माहिती

## विवेचन

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, रास्ता पेठ, पुणे या कार्यालयात दि. २७.९.२००६ रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अपीलकर्ता श्री. विजय नरसिंग माळगे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. माळगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २८.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. या अपीलाबाबत आपली कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपिलकर्त्याने दि. ८.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास कळविले आहे.

सबब,आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.०१.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद नरहरीराव भोसले
द्वारा श्री. पवार, सर्व्हे क्र. ५३/५८,
साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
शिक्षण उपसंचालक, कार्यालय,
लातूर विभाग, लातूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
शिक्षण उपसंचालक, कार्यालय,
लातूर विभाग, लातूर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ७५७ / पुणे | ४.२.२००७ | -- | २८.३.२००७ | २७.४.२००७ |
| ७५८ / पुणे | ४.२.२००७ | -- | २८.३.२००७ | २७.४.२००७ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

विद्यावर्धिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दापका (गु) ता. मुखेड, जि. नांदेड यांच्या कर्मचारी नियुक्तीच्या आदेशाची माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अंगद नरहरराव भोसले यांनी विद्यावर्धिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दापका (गु), ता. मुखेड, जि. नांदेड यांच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या आदेशाबाबत माहिती शिक्षण उप संचालक, कार्यालय, लातूर विभाग, यांच्याकडे मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. या अपिलांबाबत कोणतीही तक्रार राहिली नसल्याने, अपिले निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २८.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरुण भास्कर साने
सौ. विनया अरुण साने — अपीलकर्ता
१४६५,सदाशिव पेठ, अ-५, विष्णु सरस्वती
को. ऑप. हौसिंग सोसायटी, खजिना विहीरीजवळ,
पुणे - ४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, पुणे शहर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८० / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १.१.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ३.२.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ७.३.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अतिरिक्त पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, बिबवेवाडी, पुणे यांच्या दि. २६.९.२००६ रोजीच्या हुकुमानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडून त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती | |

## विवेचन

अपिलकर्ता श्री. अरुण भास्कर साने आणि सौ. विजया अरुण साने यांनी अतिरिक्त पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, बिबवेवाडी, पुणे यांच्या दि. २६.९.२००६ रोजीच्या हुकुमावर जिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर याच्यांकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने दिनांक २०.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. अपीलकर्त्याने हे अपील स्वखुषीने रद्दबातल करण्याबाबत दि. १.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

सबब आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि. २९.१.२००८**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे
अवधूत सावरकर कॉलनी, मार्ग क्र २ विश्रामबाग ,
सांगली ४१६ ४१५

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/९/२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे,अवधूत सावरकर कॉलनी, मार्ग क्र २ विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५ .

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका, सांगली श्री.बाजीराव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी सहाय्यक आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. रमेश सु. वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१०/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१/११/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/११/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/११/२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१.विश्रामबाग विभागासाठीची पाणीपुरवठा योजना दोन महिन्यात कार्यान्वित होईल असे कळविले होते, त्यास आज पाच महिने झाले, विश्रामबागकरिता सुधारित पाणीपुरवठा योजना होणार आहे का आणि कधी,<br>२.विश्रामबागकरिता सध्याच्या व्यवस्थेव्यतिरिक्त काळ्या खाणीवरील टाकीतून पाणी घेण्याचा प्रस्ताव आहे का, त्याचे योजना व संकल्पचित्र तयार आहे का, असल्यास किती कालावधी लागेल, अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे काय, वरीलपैकी काही केले नसल्यास / करणार नसल्यास भविष्यात तरी पुरेसा पाणीपुरवठा होणची शक्यता आहे का, की फक्त पाणीपट्टी वाढीवसुध्दा भरायची. |
|---|---|

## विवेचन

सांगली शहरातील विश्रामबाग उपनगरासाठी सांगली महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पाणीपुरवठ्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे यांनी माहिती मागितली होती. विश्रामबाग उपनगराला होणारा अपुरा पाणीपुरवठा, त्या संदर्भातील तक्रारी, महानगरपालिकेने केलेल्या घोषणा इत्यादीच्या अनुषंगाने मागितलेली ही माहिती आहे. श्री.सहस्त्रबुध्दे व अन्य काही नागरिक या विषयाबाबत सातत्याने पाठपुरावा करीत आले आहेत. विश्रामबागसाठी पाणीपुरवठ्याची सध्याच्या व्यवस्थेव्यतिरिक्तची योजना तयार असून साधारणतः दोन महिन्यात कार्यान्वित होणार आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी कळविले. परंतु त्यानुसार पूर्तता झाली नाही, म्हणून हे उत्तर मिळाल्यापासून चार महिन्यांनी श्री.सहस्त्रबुध्दे यांनी याबाबत पुन्हा विचारणा केली. त्याचे उत्तर सात आठवड्यांनी (श्री.सहस्त्रबुध्दे यांच्या म्हणण्याप्रमाणे २० दिवस विलंबाने) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी दिले. योजना दोन महिन्यात पूर्ण न होण्याचे कारण त्यांनी त्यात स्पष्ट केले. आपली दिशाभूल केली गेल्याचे नमूद करुन श्री.सहस्त्रबुध्दे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले आहे.

पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधेपासून महानगरपालिकेने आम्हां नागरिकांना १५ वर्षे वंचित ठेवले आहे. अधिकारी व लोकप्रतिनिधी आश्वासने देतात, घोषणा करतात, परंतु त्यानुसार

पूर्तता केली जात नाही. नागरिकांनी विविध मार्गांनी व विविध अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज - विनंत्या व पाठपुरावा करुनही नियमित व पुरेसे पाणी अद्याप मिळालेले नाही. योजनेला मंजुरी आहे, अनुदान आहे, पण केवळ प्रशासनाची व राजकीय नेत्यांची उदासीनता हेच योजना पूर्ण न होण्याचे कारण आहे, असे श्री.सहस्त्रबुध्दे यांनी आयोगापुढील सुनावणीत विस्ताराने लेखी व तोंडी नमूद केले. श्री.सहस्त्रबुध्दे हे निवृत्त अभियंता असून ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांची मूळ मागणी नियमित व पुरेसा पाणीपुरवठा व्हावा ही आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाहीची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. भविष्यात तरी पुरेसा पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे का, की फक्त पाणीपट्टी (वाढविलेली सुध्दा) भरत राहावयाचे, अशासारखे प्रश्न श्री.सहस्त्रबुध्दे यांनी माहितीची मागणी म्हणून विचारले आहेत. एखादी योजना कधी पूर्ण होईल व का झाली नाही असे माहितीच्या कायद्याच्या अंतर्गत विचारता येणार नाही, असे शासनाच्या दि.५.८.२००४ व १६.२.२००४ च्या परिपत्रकात नमूद असल्याचे कारण देऊन तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, हे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील शासन व्यवहारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे, असे प्रतिपादन श्री.सहस्त्रबुध्दे यांनी केले. श्री.सहस्त्रबुध्दे यांनी उपस्थित केलेले प्रश्न माहितीपेक्षा प्रशासकीय कारवाईची मागणी करणारे आहेत. त्याबाबत स्वतंत्रपणे अर्ज करण्यास आयुक्तांनी सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी अर्ज केला. त्यांच्याशी व संबंधितांशी याबाबत चर्चा झाली असून पाणीपुरवठ्याबाबतच्या व्यवस्थेचे काम सुरु असून लवकरच पूर्ण होईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी नमूद केले. डिसेंबर २००६ ला योजना पूर्ण होऊन पाणीपुरवठ्यात सुधारणा होईल, असे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिले होते. त्याला नऊ महिने उलटून गेले तरी अद्याप काम सुरु होणार असल्याचे व लवकरच पूर्ण होणार असल्याचे सांगितले जाते आहे, हे खोटी व दिशाभूल करणारी माहिती देणे आहे असे प्रतिपादन श्री.सहस्त्रबुध्दे यांनी केले.

श्री.सहस्त्रबुध्दे यांची मूळ मागणी योजनेच्या कार्यवाहीबाबतची आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत ती येत नाही. मात्र एखाद्या योजनेचे वेळापत्रक व त्यानुसार कार्यवाही न झाल्यास त्याची कारणे जाणून घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. भाष्यात्मक स्वरुपाचे उत्तर अपेक्षित असलेला प्रश्न माहितीच्या अधिकारात समाविष्ट होत नाही. परंतु नागरी

प्रश्नाबाबत शासकीय स्तरावर केले जाणारे नियोजन व त्याबाबतची कार्यवाही याचा तपशील नागरिकांना उपलब्ध करणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या पारदर्शकतेच्या तत्त्वानुसार अपेक्षित व आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) विश्रामबाग उपनगराला पाणीपुरवठा करण्याच्या व्यवस्थेसंबंधी योजनेची नेमकी पूर्तता कधी होणार, विलंबाची कारणे काय, इत्यादी तपशील अपीलकर्त्याला पुरविण्यात यावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल व योजनेच्या सध्याच्या स्थितीबाबतची माहिती दि.१०.२.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी. त्याच्या प्रतीसह पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१५.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि.30/१/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शाहिन शेख (मुक्त पत्रकार)
१२२७/ब गावभाग, सिध्दार्थ परिसर,
सांगली ४१६ ४१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मिरज उपविभाग, मिरज, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार ,
तहसीलदार कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शाहिन शेख (मुक्त पत्रकार)
१२२७/ब गावभाग, सिध्दार्थ परिसर, सांगली ४१६ ४१६

**अपिलीय प्राधिकारी** उपविभागीय अधिकारी, मिरज, उपविभाग, मिरज, जि. सांगली तर्फे
श्रीमती एस.आर.सरोदे (अव्वल कारकून)
श्री. आर. यु. अत्तार ( लिपिक )

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार , तहसीलदार कार्यालय, कवठे महांकाळ,
जि. सांगली श्री. अरविंद लाटकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.०५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.६.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००४ ते २००६ मधील मौजे थबडेवाडी, करोली (टो), सराटी (पाडेगाव रस्ता) व कोंगनोळी येथील विविध रस्त्यांचा व विविध कामांचा एकूण निधी मागणी, मंजूर व वाटप निधीची सविस्तर माहिती, कामे सुरु झालेली तारीख, संपलेले असल्यास तारीख, एकूण खर्च, कामावर हजर मजुरांची संख्या, हजेरीपत्रक (मस्टर)झेरॉक्स प्रत, कोणकोणत्या विभागामार्फत अथवा ठेकेदार व व्यक्तीमार्फत करण्यात आले होते. |

## विवेचन

मौजे थबडेवाडी, करोली (टो), सराटी (पाडेगाव रस्ता) व कोंगनोळी येथील विविध रस्त्यांचा व विविध कामांचा एकूण निधी मागणी, मंजूर व वाटप निधीची सविस्तर माहिती, कामे सुरु झालेली तारीख, संपलेले असल्यास तारीख, एकूण खर्च, कामावर हजर मजुरांची संख्या, हजेरीपत्रक (मस्टर) झेरॉक्स प्रत, कोणकोणत्या विभागामार्फत अथवा ठेकेदार व व्यक्तींमार्फत करण्यात आले होते, इ. सविस्तर माहिती अपीलकर्ता मुक्त पत्रकार श्री.शाहिन शेख यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ यांनी विविध कार्यालयांकडून मागविलेली माहिती त्यांना दिली. तसेच रोजगार हमी योजनेच्या कामावरील हजेरीपत्रकाच्या छायांकित प्रतीसाठी ८५१२/- रुपये शुल्क भरण्यास विहित मुदतीत कळवले. श्री.शेख यांनी हे शुल्क भरले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना संबंधित माहिती दिली नाही, म्हणून श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि.सांगली यांच्याकडे अपील केले. त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य मानून श्री.शेख यांचे अपील फेटाळले. या निर्णयाविरुध्द श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.शेख हे मुक्त पत्रकार असून त्यांनी मागितलेली माहिती रोजगार हमी योजने अंतर्गत काम करणाऱ्या सात विभागांकडून मागविणे आवश्यक होते. श्री.शेख यांनी दि.५.३.२००६ रोजी अर्ज केल्यानंतर दि.६.३.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित सातही विभागांना माहिती पाठविण्यास कळविले. सन २००४ ते २००६ या कालावधीतील रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या

हजेरीपत्रकांच्या प्रती श्री.शेख यांना द्यावयाच्या असून त्यासाठी आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी दि.३१.३.२००६ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले. या प्रतींव्यतिरिक्त अन्य माहिती संकलीत स्वरुपात त्यांना त्याच वेळी देण्यात आली, शुल्क भरल्यानंतर त्वरित ऊर्वरित माहिती त्यांना दिली जाईल, असे तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी श्री.अरविंद लाटकर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी संकलीत स्वरुपातील माहिती शुल्क न आकारता अपीलकर्त्यास पुरविली आहे, परंतु हजेरीपत्रकाच्या प्रतींसाठी आवश्यक ते शुल्क भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कळवूनही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही आदेशात तसे स्पष्ट नमूद केल्यानंतरही श्री.शेख यांनी शुल्क भरलेले नाही, हे योग्य नाही. त्यामुळे; माहिती देण्यास विलंब झाला, असे म्हणता येणार नाही. नियमानुसार कळविलेले शुल्क भरुन त्यांनी माहिती प्राप्त करुन घ्यावयास हवी होती.

आपल्याला देण्यात आलेली माहिती अपूर्ण, विसंगत, खोटी व म्हणून दिशाभूल करणारी असल्याचे श्री.शेख यांनी नमूद केले. काही कागदपत्रांमध्ये तारखा व रक्कम याबाबत खाडाखोड असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. परंतु कच्च्या माहितीवरुन पक्की हस्तलिखित तयार करीत असताना खाडाखोड झाली असून योग्य त्या दुरुस्त्या करुन माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ श्री.अरविंद लाटकर यांनी स्पष्ट केले. तशा आशयाची संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच वेळी सादर केलेल्या लेखी निवेदनाची प्रतही त्यांनी सादर केली.

मात्र कामे सुरु झाल्याच्या व पूर्ण झाल्याच्या तारखांमध्ये दिलेली माहिती व प्रत्यक्षातील परिस्थिती यात विसंगती आहे. निवारा, औषधोपचार इ. सोयी केल्याचे उत्तरात म्हटले आहे, पण प्रत्यक्षात तशी सोय केलेली नव्हती. शेततळी झाल्याची माहिती देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ती पूर्ण झालेली नाहीत, म्हणजेच खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असा दावा श्री.शेख यांनी केला. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ श्री.अरविंद लाटकर यांनी तो अमान्य केला.

कागदपत्रातील नोंदी प्रत्यक्ष परिस्थितीशी विसंगत असतील तर त्याचा अर्थ खोटी माहिती दिली असाच होईल. तसेच तारखा व रक्कम यातील खाडाखोडीबाबतही वस्तुस्थिती लेखी

स्पष्ट होणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांचे निवेदन व प्रत्यक्ष पाहणी करुन अपीलकर्त्याने केलेले प्रतिपादन लक्षात घेता याबाबत शहानिशा होणे आवश्यक आहे. म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ यांनी अपीलकर्त्यासोबत समक्ष पाहणी करुन दि.३०.९.२००७ पर्यंत वस्तुस्थितीचा अहवाल सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार श्री. शेख यांना दि. २०.९.२००७ रोजी प्रत्यक्ष सर्व कामे दाखविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ श्री.अरविंद लाटकर यांनी आयोगाला दि. १५.१०.२००७ रोजी (प्राप्त दि. १९.१०.२००७ ) पाठविलेल्या अहवालात नमूद केले आहे. 'श्री. शाहिन शेख यांनी मागणी केलेल्या गावांमधील आक्षेप घेतलेल्या शेततळ्यांबाबत छोटे पाटबंधारे, पंचायत समिती, कवठेमहांकाळ व लघु पाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग विटा यांचेकडील कामाची तपासणी करण्याची मागणी केली. त्यास अनुसरुन अर्जदार यांचेसोबत दोन्ही कार्यान्वित यंत्रणा याना अर्जदार यांचे मागणीप्रमाणे कामे दाखविण्याच्या सूचना दिल्या. अर्जदार यांनी कामाची पाहणी करुन झालेनंतर लेखी म्हणणे सादर करतो, असे श्री.शाहिन शेख यांनी समक्ष सांगितले. परंतु अद्याप लेखी म्हणणे अथवा आक्षेप प्राप्त झाला नाही. अर्जदाराच्या मागणीप्रमाणे अर्जदार यांना झालेली कामे दाखविण्यात आली आहेत. तसेच अर्जदार यांना ऊर्वरित मागणी केलेली माहिती रक्कम रुपये ८५१२/- भरल्यानंतर देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे,' असेही त्यांनी या अहवालात म्हटले आहे. उपविभागीय अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग विटा-२ यांनी दि.२०.९.२००७ रोजी श्री.शेख यांना प्रत्यक्ष कामे दाखविल्याचे दि. २४.९.२००७ रोजी तहसीलदारांना कळविले, त्या पत्राची प्रत तहसीलदार श्री. लाटकर यांनी या अहवालासोबत सादर केली आहे. तसेच उप अभियंता, छोटे पाटबंधारे उपविभाग, पंचायत समिती, कवठे महांकाळ यांनी 'शेततळ्यांबाबत श्री. शेख यांना प्रत्यक्ष गटामध्ये पहाणी करून पडताळणी करून देण्यात आली. सर्व शेततळ्यांमध्ये पाणीसाठा झालेला आहे, दोन शेततळी पाहण्याची आवश्यकता नसल्याचे श्री. शाहिन शेख यांनी सांगितले,' असे अन्य पत्रात नमूद केले आहे.

वरील विवेचनावरुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

# आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहिती मागितल्यानंतर त्यासाठी कळविले गेलेले शुल्क न भरण्याची अपीलकर्ता श्री.शाहिन शेख यांची कृती योग्य नाही. रु.८५१२/- शुल्क भरुन ऊर्वरित माहिती श्री.शेख यांनी घ्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग,पुणे**

**पुणे.**
**दि. २२.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय नरसिंग माळगे
घर क्र.११८, कोंढवा खुर्द,
परदेशी स्वीटच्या मागे, पुणे-४८

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, पुणे शहर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पुणे शहर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ८७८ / पुणे | २७.२.२००७ | -- | ३.४.२००७ | -- |
| ८७९ / पुणे | २०.२.२००७ | १९.३.२००७ | ३.४.२००७ | -- |
| ८८० / पुणे | २८.२.२००७ | १६.३.२००७ | ३.४.२००७ | -- |
| ८८१ / पुणे | २०.२.२००७ | १६.३.२००७ | ३.४.२००७ | -- |
| ८८२ / पुणे | २३.२.२००७ | १३.३.२००७ | ३.४.२००७ | -- |
| ८८३ / पुणे | २६.२.२००७ | ६.३.२००७ | ३.४.२००७ | -- |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

पुरवठा शाखेतील शिधावाटप पत्रिका व पुरवठा दुकाना संबंधित माहिती व श्रीमती एस. डी. देशपांडे, पुरवठा अव्वल कारकून यांच्या कार्यकाला संबंधित त्या कार्यालयातील माहिती

# विवेचन

अपीलकर्ता श्री. विजय नरसिंग माळगे यांनी अन्न पुरवठा कार्यालयाशी निगडीत काही मुद्दयांची व श्रीमती एस.डी. देशपांडे, अव्वल कारकून यांच्या त्या कार्यालयातील सेवाकार्यकाळाविषयीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर व अपीलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. माळगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले दाखल केली आहेत.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. आपल्याला आवश्यक असणारी माहिती मिळाली असल्याने आपली कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे आपली अपिले निकाली काढावी, असे श्री. माळगे यांनी दि. १०.१२.२००७ व दि. ८.१.२००८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २९.०१.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. अरविंद नामदेव शिंदे
गगनगिरी १०० फुटी रोड, पाकिजा मसजिद जवळ, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख , सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख ,वाळवा, मु.पो. इस्लामपूर, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९ / सांगली /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अरविंद नामदेव शिंदे,गगनगिरी १०० फुटी रोड,
पाकिजा मसजिद जवळ, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली करिता
श्री. पी.बी. माने, प्रमुख लिपिक

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख ,वाळवा, मु.पो. इस्लामपूर,
जि. सांगली श्री. अे. आर. जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/१/२००६, ०३/६/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/२/२००६, १३/२/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/२/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५/४/२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(अ)कोणत्या आदेशाने गट क्र.१४६३व १४६३/२ या गटांची फोड केलेबाबतची सविस्तर माहिती.<br>(ब)सौ.लक्ष्मीबाई दिनकर पाटील यांनी आपल्याकडे गट क्र.१४६३ चे मोजणीकरिता दिलेल्या सर्व कागदपत्रांची नक्कल.<br>(क)श्रीमती व्रालूबाई पांडुरंग शिंदे, रा.येलूर, सौ.यशोदा यशवंत पाखरे, रा.नाशिक, सौ.शैला बाळासाहेब डोईफोडे, रा.किणी यांचा सविस्तर पत्ता सौ.लक्ष्मीबाई दिनकर पाटील यांना माहिती असताना श्री.नामदेव पांडुरंग शिंदे यांच्या पत्त्यावर पाठविण्यामागचे कारण<br>(ड)श्री.नामदेव पांडुरंग शिंदे यांना नोटीस न पाठविण्यामागचे सविस्तर कारण. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अरविंद नामदेव शिंदे यांनी जमिनीच्या मोजणीच्या संदर्भातील कागदपत्रांची मागणी माहितीच्या अधिकारात केली होती. या संदर्भात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द श्री.शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाची सुनावणी होऊन मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी दि.४.९.२००६ रोजी निर्णय दिला. वाटणीपत्राची प्रत अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावी असे आदेश डॉ.जोशी यांनी दिले. त्यानुसार कागदपत्रे मिळाली नाहीत, ती मिळावीत व जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलाद्वारे केली आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ केली, असा श्री.शिंदे यांचा आरोप आहे. डॉ.जोशी यांच्या निर्णयानंतर माहिती देण्याच्या संदर्भातील पत्र म्हणून आपल्याला जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, वाळवा श्री.ए.आर.जाधव यांनी पाठविलेल्या लिफाफ्यात एकदा वेगळाच कार्यालयीन अर्ज होता, तर दुसऱ्या वेळी केवळ कोरा

कागद पाठविला होता. माहिती देणे टाळण्यासाठी जन माहिती अधिकारी श्री.ए.आर.जाधव हे मुद्दाम असे करतात, असे प्रतिपादन श्री.शिंदे यांनी केले. परंतु आपण असे मुद्दाम केलेले नाही, त्यांच्या लिफाफ्यात एकदा चुकीचे पत्र रवाना झाले हे खरे आहे. ही चूक झाली असली तरी माहिती तयार आहे. माहितीची एकूण ४०४ पाने होत असून प्रत्येक पृष्ठाला २ रुपये याप्रमाणे एकूण ८०८ रुपये शुल्क भरुन माहिती घेऊन जावी, असे त्यांनी कळविले आहे. परंतु त्यांनी ही कागदपत्रे नेली नाहीत, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, फलटण श्री.ए.आर.जाधव यांनी सांगितले. संपूर्ण माहिती तयार असून शुल्क भरताच ती देण्यात येईल, माहिती नि:शुल्क द्यावयाची असल्यास तशीही तयारी आहे असे श्री.जाधव यांनी नमूद केले. मात्र आपल्याला विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, शुल्क भरण्याच्या पत्राबाबत श्री.जाधव यांनी जाणीवपूर्वक चुकीचे पत्र पाठवून टाळाटाळ केली आहे, त्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, अशी आपली मागणी कायम असल्याचे प्रतिपादन श्री.शिंदे यांनी केले.

मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी निर्णय दिल्यानंतर श्री.शिंदे यांना त्वरित माहिती दिली जाणे आवश्यक होते. शुल्काबाबतचे पत्र पाठविण्यात लिपिकाच्या हलगर्जीपणामुळे चूक झाल्याचे जन माहिती अधिकारी श्री.जाधव यांनी म्हटले असले तरी लिपिकावर ही जबाबदारी ढकलून त्यांना मोकळे होता येणार नाही. मात्र माहिती नि:शुल्क द्यावी असा निर्णय मुख्य माहिती आयुक्तांनी दिलेला नाही व मुख्य माहिती आयुक्तांकडील निर्णयानंतरही अपिलकर्त्याने शुल्क भरलेले नाही. तरीही झालेला विलंब लक्षात घेता अपीलकर्त्याला माहिती नि:शुल्क देणे आवश्यक आहे. मात्र तांत्रिक चूक करणाऱ्या अधिकाऱ्यामुळे छायांकनाच्या खर्चाचा भूर्दंड शासनाला पडता कामा नये, अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती तयार ठेवली आहे हे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. शुल्क भरले न गेल्यामुळे त्यांनी त्या प्रती अपीलकर्त्याला दिलेल्या नाहीत, हे लक्षात घेता माहिती देण्यास हेतुत: त्यांनी टाळाटाळ केल्याचे सिध्द होत नाही. चुकीचे पत्र पाठविल्याबद्दल त्यांनी व्यक्त केलेली दिलगिरी मान्य करुन शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील मान्य.

(२) अपीलकर्त्याला द्यावयाचे माहितीसाठीचे शुल्क रुपये ८०८/- जन माहिती अधिकाऱ्यांनी व्यक्तीशः स्वतः भरावे व अपीलकर्त्याला एक आठवड्यात माहिती निःशुल्क पुरवावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्याचा पूर्तता अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, फलटण श्री.ए.आर.जाधव यांनी दि.५.२.२००८पर्यंत आयोगाला सादर करावा. या पूर्ततेची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
दि.२५/१/२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.कृष्णा भाऊ सुर्यवंशी
मु.पो.सावंतपूर, ता. पलूस,
जि. सांगली ४१६ ३१०.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पलूस, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, पलूस, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५+२ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११/९/२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा भाऊ सूर्यवंशी
मु.पो.सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली ४१६ ३१०

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पलूस, जि. सांगली
श्री.अरविंद बी. कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, पलूस, जि. सांगली
श्री.एस.डी.कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/१२/२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/१२/२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/२/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७/४/२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>आंधळी गाडी रस्ता पूर्वपरंपरा अस्तित्वात आहे.सध्या गाडीरस्ता गट क्र.६८३ च्या उत्तरेच्या व दक्षिणेच्या पूर्वेस ताल टाकून अडविला आहे. सदर अतिक्रमण दूर करुन केलेल्या कृतीबद्दल माहिती. सदर रस्त्याबाबत घेतलेल्या संबंधित गट क्र.६८८,६८३,६५६ च्या खातेदारांच्या जाबजबाबाच्या छायांकित प्रती, केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कृष्णा भाऊ सूर्यवंशी यांनी मागितलेली माहिती गाडीरस्त्यावरील अतिक्रमणाबाबतची आहे. गाडीरस्ता अडवून केलेल्या अतिक्रमणाविरुध्द झालेल्या जाबजबाबानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळावा, अशी मागणी त्यांनी केली होती. परंतु हा कृती-अहवाल म्हणजेच अतिक्रमण हटविण्याची कृती व्हावी, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. वेगवेगळ्या मार्गांनी व वारंवार तक्रार करुनही गेल्या चार वर्षांत तहसीलदार, पलूस काहीही कार्यवाही करीत नाहीत. रस्त्यावरील अतिक्रमण दूर करण्याचे अधिकार तहसीलदारांना शासनाने दिले आहेत. तसेच भूमी अभिलेख अधिकारी, तालुका तासगाव यांचेकडील पुरावे त्यांना सादर केले आहेत. परंतु तरीही अतिक्रमण करणाऱ्यांना ते संरक्षण देत आहेत, असा श्री.सूर्यवंशी यांचा आक्षेप आहे. राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत त्यांनी तो लेखी व तोंडी नोंदविला. श्री.सूर्यवंशी यांचा आक्षेप असलेल्या श्रीमती शोभा सुरेश माने व श्री.सूर्यवंशी यांनी संयुक्त मोजणी करुन घ्यावी. त्याशिवाय अतिक्रमणाबाबत निर्णय व कार्यवाही करता येणार नाही, असे त्यांना कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पलूस श्री.डी.एस.कुंभार यांनी नमूद केले. संबंधित गटात गाव नकाशातील रस्ता आहे की नाही याची माहिती तहसीलदारांनी मोजणी खात्याकडून घेऊन दिली पाहिजे, असे प्रतिपादन श्री.सूर्यवंशी यांनी केले.

श्री.सूर्यवंशी यांची मागणी माहितीपेक्षा कृतीची आहे. अशा प्रकारच्या कार्यवाहीची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र गाव नकाशातील रस्ता संबंधित जमिनीच्या गटात आहे की नाही याची, तसेच मूळ मागणी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांना शक्य व आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी अपीलकर्त्याने केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती, तसेच गाव नकाशातील रस्ता जमिनीच्या संबंधित गटात आहे का, याची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल दि.२५.१.२००८ पर्यंत त्यांनी आयोगाला सादर करावा.

पुणे.
दि. १४/१/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद नरहरीराव भोसले
द्वारा सदलापुरे, सर्व्हे क्र. ५३/५८
साईनाथनगर, वडगांव शेरी, पुणे-१४

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अध्यक्ष, श्री. स्वामी समर्थ अध्यापक विद्यालय,
वैभववाडी, ता. वैभववाडी, जि. सिंधुदूर्ग

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
प्राचार्य, श्री. स्वामी समर्थ अध्यापक विद्यालय,
वैभववाडी, ता. वैभववाडी, जि. सिंधुदूर्ग

| अ.क्र | अपील क्रमांक | ९९ / पुणे |
|---|---|---|
| १ | जा माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २५.२.२००६.२००६ |
| २ | जा माहिती अधिका-यो उत्तर दिल्याची तारीख | १.४.२००६ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | २८.४.२००६ |
| ४ | अपिलीय प्राधिका-यो ि्णय दिल्याची तारीख | -- |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सन २००३.२००४ या शैक्षणिक वर्षात एकूण किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. प्रथम वर्षासाठी किती विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. या शैक्षणिक वर्षाकरीता शासनाची व एन.सी.टी.ई. ची मान्यता घेतली होती का ? तसेच या शैक्षणिक वर्षातील डोनेशनच्या अनुषंगाने माहिती

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. अंगद नरहरीराव भोसले यांनी श्री. स्वामी समर्थ अध्यापक विद्यालय, वैभववाडी, जि. सिधुंदुर्ग या संस्थेबाबत सन २००३.२००४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश व अन्य मुद्दयांची माहिती विचारलेली होती. जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्याकडील माहितीने समाधान न झाल्याने श्री. भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २६.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. संदर्भीत अपिलाबाबत आपली कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २३.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास कळविले आहे.

सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.०१.२००८**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे**